# फ्रान्स



युरोप खंडाच्या सफरीची खरी मजा येते ती रोड ट्रिपमध्ये. उत्तम रस्ते,अप्रतिम निसर्गसौंदर्य आणि ठिकठिकाणी असणाऱ्या सोयी यांमुळे हा प्रवास अतिशय सुखकर होतो. लांब लांब पसरलेली हिरवीपिवळी शेतं,मधूनच दिसणारी छोटी छोटी गावं फार सुंदर दिसतात.अचानक मिळालेली बर्फवृष्टी किंवा पावसाच्या हलक्या सरीनंतर कुठल्यातरी थांब्यावर थंडीत घेतलेल्या खास युरोपियन कॉफीचा दरवळ आणि तिथली स्थानिक लोकं कायम आठवणीत राहतात. प्रकर्षाने लक्षात राहते ती त्या देशाची भाषा .बेल्जियम फ्रान्स या प्रवासात आपल्याला याची किंचित झलक मिळते.

फ्रान्स हा युरोपातील रशिया आणि युक्रेन नंतरचा क्षेत्रफळाच्या दृष्टीने मोठा देश आहे.त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण षटकोनी भौगोलिक आकारामुळे त्याला 'लेग्जागॉन'(L'hexagone) असेही म्हणतात. फ्रान्सच्या उत्तरेला बेल्जियम,उत्तर पूर्वेला जर्मनी,दक्षिणेला स्पेन व भूमध्य समुद्र असून त्याच्या पूर्वेला स्वित्झर्लंड ,इटली हे देश आहेत.अथांग

# फ्रान्स

पसरलेला  अटलांटिक समुद्र हा फ्रान्सच्या पश्चिमेकडे आहे.उत्तर आणि पूर्व दिशांना सदैव बर्फाच्छादित असणाऱ्या आल्प्सच्या पर्वतराजींपासून ते पश्चिम आणि दक्षिणेकडे असलेल्या समुद्रकिना-यांपर्यंत वैविध्याने नटलेला फ्रान्स हा पर्यटकांच्या दृष्टीने जगातील सर्वात लोकप्रिय देश आहे.

भाषा,विविध कला, संगीत,शास्त्र इत्यादींमध्ये  प्राविण्य असलेली  फ्रेंच माणसं ही जगभरात अतिशय कलासक्त म्हणून ओळखली जातात..जगभरात सगळीकडे बोलली व शिकवली जाणारी फ्रेंच ही अतिशय गोड भाषा आहे .सतराव्या शतकापासून ते विसाव्या शतकापर्यंत ही भाषा राजकारण,व्यापार,आंतरराष्ट्रीय संबंध या क्षेत्रात अतिशय व्यापक प्रमाणात वापरली गेली.युरोपातील कॉलनी करणाऱ्या देशांच्या पहिल्या  फळीतले आघाडीचे लोक म्हणजे फ्रेंच. अगदी अमेरिकेपासून ते आफ्रिका, मिडल ईस्ट ,आशिया ते ऑस्ट्रेलिया पर्यंत त्यांनी आपल्या कॉलनी केल्या.गमतीची गोष्ट म्हणजे या कॉलनीच्या काळात फ्रेंच लोक वेगळ्या भागात मायग्रेट होऊ लागल्याने फ्रेंच बोलणारी माणसे फ्रान्स पेक्षा इतर देशात जास्त आढळू लागली.आपल्याला सुद्धा कळत नाही त्या सहजतेने आपण रोजच्या जगण्यात कॅफे ,ऑम्लेट,मेनू ,डेपो इत्यादी फ्रेंच शब्द  वापरत असतो.

फ्रान्समधील वातावरण सुंदर असते. उन्हाळ्याच्या उबदार वातावरणाचा आनंद घेण्यासाठी अगदी नॉर्वे ,स्वीडन ,रशिया इथपासून लोकं स्वतः गाड्या चालवत येथे राहण्यासाठी  येतात. आपल्या सुंदर भाषेप्रमाणे फ्रेंच जेवणही जगप्रसिद्ध आहे. असं म्हणतात युरोपियन जेवणामध्ये फ्रेंचांनी आपल्या पाककौशल्याने 'क्लास' आणला. फ्रान्समध्ये जवळपास ४०० निरनिराळ्या प्रकारची चीज होतात.त्यांची वेगवेगळ्या प्रकारची बेकरी प्रॉडक्ट्स संपूर्ण युरोपात प्रसिद्ध आहेत. फ्रेंच वाइन्स तर जगभरात नाव कमावून आहेत. परफ्युम्सच्या क्षेत्रात त्यांनी केलेल्या असामान्य संशोधनातून फ्रेंचांनी परफ्यूम निर्मितीत आपले मापदंड निर्माण केले. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात फ्रेंचांनी आपला कलात्मक दृष्टीकोन ठेवला. त्यातूनच निर्माण झालं पॅरिससारखं अतिशय सुंदर शहर...सर्व कलांचे माहेरघर...त्याबद्दल पुढच्या भागात